RCS 42/2026 - 1 -
Exh.1

दै. रजि. नं. /2026. रे. क. नं. /2026.

दि. 12/03/2026.

# मे. दिवाणी न्यायाधीशसाो, क, स्तर, कागल

यांचे कोर्टात............

श्री. रत्नाकर दौलू लोहार
व.व. 80 धंदा – पेन्शनर
रा. निढोरी ता. कागल जि. कोल्हापूर } वादी

विरूध्द

1. श्री. संजय बाजीराव लोहार
   व.व. 48 धंदा – शेती
2. श्री. संपत बाजीराव लोहार
   व.व. 45 धंदा – शेती

रा.दोघेही निढोरी ता. कागल जि. कोल्हापूर } प्र.वादी

दावा कायम मनाई ताकीद होवून मिळणेबाबत

दावेची सर्व कारणांकरिता आकारणी रू.1000/–

यातील वादी मे.कोर्टास नम्रपणे कळवितात की,

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.

Order

Issue suit summons to the defendants for the filing of written statement, documents and settlement issues.The defendants shall file the same within 30 days of service of suit summons.

Date : 16/03/2026 C.J.J.D.,Kagal

1. दावा मिळकतीचे वर्णन :–

मौ. निढोरी ता. कागल जि. कोल्हापूर येथील,

सि. स. नं. 183 क्षेत्र 12.00 चौ. मी. ची बोळ मिळकत यासी चतु:सिमा – पुर्वेस – वादी यांची सि. स. नं. 178 ची मिळकत,

पश्चिमेस – प्रतिवादी यांची सि. स. नं. 182 ची मिळकत,

दक्षिणेस – रस्ता

उत्तरेस – प्रतिवादी यांची सि. स. नं. 182 ची मिळकत,

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत सदर दावेचा विषय असून येथून पुढे सदर मिळकतीस दावा मिळकत असे संबोधणेत येत आहे.

2. दावा मिळकत यातील वादी व प्रतिवादी यांचे वडील कै. बाजीराव हरी लोहार यांचे प्रत्यक्ष मालकी व सामाईक कब्जा वहिवाटीची मिळकत आहे. दावा मिळकतीचे प्रॉपर्टीकार्ड पत्रकी यातील वादी व प्रतिवादी यांचे वडील कै. बाजीराव हरी लोहार यांचे नावच्या नोंदी मालक सदरी झालेल्या आहेत. दावा मिळकत वादी हे मालक नात्याने सन 1983 पासून सामाईकात कब्जेवहिवाटीत आहेत. दावा मिळकतीचे चौकशी रजि. पत्रकी दि. 15/12/1983 पासून वडीलार्जित व सामाईकपणे नोंद झालेली आहे. दावा मिळकतीशी यातील प्र.वादी यांचा एकटयाचा कसलाही हक्क अगर हित्तसंबंध नाही.

3. दावा मिळकतीमध्ये यातील वादी हे दक्षिणेकडील रस्त्यावरून ये – जा करीत असतात. तसेच सदर मिळकतीचा ग्रा.पं. फाळा यातील वादी भरत आलेले आहेत. सध्या प्रतिवादी यांचे वडील कै. बाजीराव हरी मयत असून अदयाप मयत बाजीराव हरी लोहार यांचे नावाच्या नोंदी प्रॉपर्टी कार्ड पत्रकी वादी यांचे नावासह सामाईकात झालेल्या आहेत. वादी व प्रतिवादी सदरची मिळकत बोळ म्हणूनच सामाईकात वापरत आहेत. वादी यांनी सि. स. नं. 178 सह दावा मिळकतीची दि. 28/04/2014 इ. रोजी नियमित मोजणी घेतलेली आहे.

Oundale 15/03/2016

4. वरील प्रमाणे परिस्थिती असताना यातील प्रतिवादी यांनी दि. 10/02/2026 इ. रोजी दावा मिळकतीमध्ये अनाधिकराने व बेकायदेशिरपणे, ग्रा. पं. ची परवानगी न घेता अतिकमण करणेचे हेतूने बांधकाम करणेसाठी पाया खुदाई करणेस सुरूवात करू लागले. सदर बांधकामास यातील वादी यांनी गावातील प्रतिष्ठित लोक व पंचासमक्ष हरकत व तकार केली असता यातील प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये बांधकाम करणार नसलेचे सांगून सि. स न. 182 मध्ये हददी नुसार बांधकाम करणार असलेचे सांगितले. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांना सि. स. नं. 182 मध्ये बांधकाम करणेस हरकत नसलेचे सांगितले. सध्या प्रतिवादी यांनी स्लॅबपर्यतचे बांधकाम पुर्ण केलेले आहे व दिनांक 10/03/2026 इ. रोजी यातील प्रतिवादी यांनी अचानक पणे दावा मिळकतीमध्ये स्लॅबमधून दावा मिळकतीमध्ये अतिकमण करून बेकायदेशिर वाढीव बांधकाम करणेचे हेतूने सेंट्रींगचे लोखंडी पोल उभे करून वादी यांचे पुर्वेकडील सि. स. नं. 178 च्या भिंतीपर्यत सेंट्रींगच्या पटटया व बिंबाचे काम सुरू केले आहे. यातील प्रतिवादी यांनी दावा मिळकत बोळ अंदाजे पुर्व पश्चिम 3.5 फुट रूंद व दक्षिण – उत्तर 30 फुट लांबीचे दावा मिळकतीमध्ये बेकायदेशिर व वाढीव स्लॅबचे काम करणेस सुरूवात केलेली आहे. प्रतिवादी यांचे सदरचे कृत्य बेकायदेशिर व वादी यांचे न्याय हक्कावर गदा आणणारे आहे. दावा मिळकत वादी व प्रतिवादी यांचे सामाईक मालकी व सामाईक कब्जे वहिवाटीची मिळकत आहे. असे असताना निव्वळ वादी यांचे हक्क व अधिकार डावलण्याचे हेतूने प्रतिवादी अनाधिकाराने, बेकायदेशिपपणे व गुंडगिरीच्या जोरावर वाढीव बांधकाम करणेचा प्रयत्न करीत आहे. वादी यांनी प्रतिवादी यांना व मजूर लोकांनाही समजावून सांगणेचा प्रयत्न करित असता यातील प्रतिवादी नं. 1 यांनी वादीस अर्वाच्य शिवीगाळी करून "तुझा या मिळकतींशी काहीही संबंध नाही" "दावा मिळकत माझ्या मालकीची आहे, तुमचा सदर मिळकतीशी कोणताही हक्क व अधिकार नाही " असे म्हणून दावा मिळतीमधील वादी यांचे मालकी हक्क नाकारून सामाईक कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा निर्माण करून वादीचे असले प्रत्यक्ष मालकी व सामाईक शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करून वादीस दावा मिळकतीमधून हुसकावून लावणेचा प्रयत्न केलेला आहे.

Assistant Superintendent

5. वादी यांनी स्वतः व गावातील कांही प्रतिष्ठीत नागरीकांनी प्रतिवादी यांना समजावून सांगणेचा प्रयत्न केला परंतू प्र.वादी हे कांहीही ऐकण्याचे तयारीत नाहीत. म्हणून यातील वादी यांनी प्रतिवादी यांना दि. 11/03/2026 इ. रोजी ॲड. सुधीर एम. सावर्डेकर यांचे मार्फत रितसर कायदेशिर नोटीस पाठविली तरीही यातील प्रतिवादी कांही राजकीय लोकांचे पाठींब्यावरून व गुंडगिरीच्या जोरावर दावा मिळकतीमध्ये दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करून बेकायदेशिर बांधकाम करणेचा प्रयत्न करीत आहेत. सदरचे प्रतिवादी यांचे कृत्य बेकायदेशिर असून वादी यांचे न्याय हक्कावर गदा आणणारे आहे. त्यामुळे वादीस प्रतिवादीविरूद्ध सदरचा कायम मनाईचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

6. दावेस कारण :–

प्रतिवादी यांनी दि. 10/02/2026 इ. रोजी दावा मिळकतीमध्ये अनाधिकराने व बेकायदेशिरपणे, ग्रा. पं. ची परवानगी न घेता अतिक्रमण करणेचे हेतूने बांधकाम करणेसाठी पाया खुदाई करणेस सुरूवात केली. त्यानंतर यातील प्रतिवादी यांनी स्लॅबपर्यंतचे बांधकाम पुर्ण करून दिनांक 10/03/2026 इ. रोजी यातील प्रतिवादी यांनी अचानक पणे दावा मिळकतीमध्ये स्लॅबमधून दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करून बेकायदेशिर वाढीव बांधकाम करणेचे हेतूने सेंट्रींगचे लोखंडी पोल उभे करून वादी यांचे पुर्वेकडील सि. स. नं. 178 च्या भिंतीपर्यंत सेंट्रींगच्या पटटया व बिंबाचे काम सुरू केले आहे. यातील प्रतिवादी यांनी दावा मिळकत बोळ अंदाजे पुर्व पश्चिम 3.5 फुट रूंद व दक्षिण – उत्तर 30 फुट लांबीचे दावा मिळकतीमध्ये बेकायदेशिर व वाढीव स्लॅबचे काम करणेस सुरूवात केली त्यावेळी व त्या सुमारास सदरचे दावेस कारण घडले आहे.

7. दाव्याचा तपशिल :–

| रू. पैसे | |
|---|---|
| 1000 – 00 | दावा कायम मनाई ताकीद होवून मिळणेकरिता असलेने दावेची केलेली आकारणी. |
| 1000 – 00 | एकूण दावेची आकारणी. |

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,

8. दावेची आकारणी :–

बॉम्बे कोर्ट फी ॲक्ट कलम 6 (iv)(j) मधील तरतुदीनुसार सदर दावेची आकारणी केलेली असून योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे.

9. वादी प्र.वादी व दावा मिळकत मे. कोर्टाच्या स्थलसिमेत असलेमुळे सदरचा दावा मे. कोर्टात चालणेस पात्र आहे.

10. वादीने प्र.वादी विरूद्ध अशाप्रकारचा अन्य कोणत्याही कोर्टात दावा दाखल केलेला नाही.

11. सबब, वादी यांची मे.कोर्टांना विनंती की,

अ. वादीचा दावा खर्चासह मंजूर करणेत यावा.

ब. यातील प्रतिवादी अगर तर्फे इसमानी दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू नये तसेच वादी यांचे दावा मिळकतीमधील असले शांततापूर्ण मालकी व सामाईक कब्जेवहिवाटीस हरकत अगर अडथळा करू नये असा कायम मनाई आदेश व्हावा हि नम्र विनंती.

क. सदर दावेचा खर्च प्र.वादीकडून वसूल होवून मिळावा.

ड. जरूर तर दावा दुरूस्तीस मे.कोर्टाची परवानगी मिळावी.

इ. इतर अनुषंगिक न्यायाचे हुकूम याच कामी वादीचे बाजूने व्हावेत.

...............येणेप्रमाणे दावा असे सोबत वकीलपत्र, कागदांची यादी त्याप्रमाणे कागद, पत्तामेमो व प्र.वादीस देणेसाठी दावेच्या प्रति असे कागल.

तारीख 12/03/2026.

तयार करणार व दाखल करणार

( ॲड. सुधीर मा. सावर्डेकर )

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,

## प्रतिज्ञा

मी श्री. रत्नाकर दौलू लोहार व.व. 80 धंदा – पेन्शनर रा. निढोरी ता. कागल जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की वर नमूद दावेतील संपूर्ण मजकूर माझे प्रत्यक्ष माहीती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मु. कागल ता. 12/03/2026.

## ॲफिडेव्हिट

मी श्री. रत्नाकर दौलू लोहार व.व. 80 धंदा – पेन्शनर रा. निढोरी ता. कागल जि. कोल्हापूर देवाशपथ खरे सांगतो की वर नमूद दावेतील संपूर्ण मजकूर माझे प्रत्यक्ष माहीती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हिट आज मु. कागल ता. 12/03/2026.

ॲफिडेव्हिट करणा–यास मी ओळखतो

( ॲड.सुधीर मा. सावर्डेकर )

## प्रतिज्ञा

मी श्री. रत्नाकर दौलू लोहार व.व. 80 धंदा – पेन्शनर रा. निढोरी ता. कागल जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की वर नमूद दावेतील व ॲफिडेव्हिटमधील संपूर्ण मजकूर माझे प्रत्यक्ष माहीती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मु. कागल

ता. 12/03/2026.

Solemnly Affirmed before me by
Shri रत्नाकर दौलू लोहार
identified by Shri ॲड. सुधीर सावर्डेकर
whom I know personally
Dated 12/03/2026

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.03.16 17:19:55 +0530